अग्रलेखांचा बादशहा नवा काळ

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा बादशहा नवा काळ

# सृष्टीच्या सौंदर्याची किती अवहेलना करणार?

सगळ्या सृष्टीचा व्यवहार एका विशिष्ट कालगतीने सुरू असतो. रोज सकाळी न चुकता उगवणारा सूर्य आणि त्याच्या मावळतीबरोबर जगाला विश्रांतीची गरज सांगणारी रात्र या दोन गोष्टींचा जरी नीट विचार केला तरी सृष्टीच्या कालगतीची कल्पना येते. हजारो वर्षांपासून सृष्टीचे हे वेळापत्रक अखंडपणे सुरू आहे. या कालमानाचे रहस्य कोणीही सहजासहजी उलगडू शकत नाही. कदाचित ते अनेकांच्या आकलनापलीकडे असल्यामुळे त्या कालमानाला उगाच धक्के देण्याचा प्रयत्न मनुष्य करतो आणि त्यातूनच आजच्या पर्यावरणाच्या समस्या उभ्या करतो. दरवर्षी ५ जून हा दिवस पर्यावरण किंवा वसुंधरा दिन म्हणून जगभर पाळला जातो. यामागे पर्यावरणाविषयी जागृती व्हावी या सगळ्या सृष्टीच्या व्यवहाराची जाणीव सगळ्यांना असावी. मनुष्याने त्यानुसार आपल्या जीवनाची रचना आखावी असा हेतू असतो. परंतु आज इतक्या अनेक प्रकारांनी या सगळ्या विश्वाचे वातावरण प्रदूषित होत आहे ते कसे सांभाळून ठेवावे असा यक्ष प्रश्न निर्माण झाला आहे. आपल्या सुखासाठी मनुष्याने विज्ञानाचा आधार घेतला. नवनवीन शोध लावले. प्रचंड वेगाने जगभर औद्योगिकीकरणही झाले. परंतु सुखाच्या या हव्यासापोटी त्याने सृष्टीच्या सौंदर्यालाही नकळतपणे नख लावले आणि आज ढासळते पर्यावरण ही एक भळभळती जखम ठरली आहे. शुध्द हवा शुद्ध पाणी दुर्मिळ होत आहे. मोठमोठ्या नद्या कारखान्यांच्या सांडपाण्यामुळे आणि मनुष्याच्याच अनेक वाईट सवयींमुळे प्रदूषित होत आहे. वाढत्या शहरीकरणामुळे एकूणच जीवनमानामध्ये बकालपणा वाढू लागला आहे. सुखाच्या लालसेच्या या उतावीळपणाला कुठेतरी लगाम घालावा लागेल. अशी जाणीव हळूहळू निर्माण होत आहे. परंतु ती पुरेशी नाही. येणाऱ्या पंचवीस वर्षामध्ये पर्यावरणाविषयी लोकांनी स्वत: पुढाकार घेऊन उपाययोजना केली नाही. ते जगातल्या पन्नास टक्के लोकांना नव्या व्याधी आणि रोगांना सामोरे जावे लागेल आणि ते नुकसान भरून काढणे आणखीनच कठीण जाईल. पर्यावरणाची ही चळवळ केवळ हवा, पाणी या दोन गोष्टींपुरतीच मर्यादित नाही तर त्याला अनेक घटकसुद्धा कारणीभूत ठरत आहेत. प्रामुख्याने मनुष्याकडूनच या सगळ्या सृष्टीच्या सौंदर्याची अवहेलना होत आहे.

## निसर्गाचा अवमान नको

पृथ्वीचा सत्तर टक्के भाग पाण्याने व्यापला आहे असे म्हणतात, परंतु आज मनुष्याला पिण्याचे पाणीदेखील पुरेशा प्रमाणात मिळू शकत नाही. कारण मोठमोठ्या नद्या पर्यावरणाच्याच ऱ्हासामुळे शुष्क होत आहे. बेसुमार जंगलतोड, पृथ्वीच्या अनेक भागांमध्ये वेगवेगळ्या खनिजांसाठी केले जाणारे भीषण असे खोदकाम, दगड कोळसा इथपासून ते लोखंड पोलाद किंवा जस्तासाठी आणि बऱ्याचवेळेला तर काँक्रिटची जंगले उभारण्याकरता लागणाऱ्या दगडांसाठीसुध्दा मोठमोठे पर्वत पोखरून काढले जात आहेत. मनुष्याला त्याच्या अस्तित्वाकरता निश्चितच काही गोष्टींची गरज आहे. परंतु ते सगळेच पृथ्वीच्या पोटातून ओरबाडून काढण्याचा त्याचा प्रयत्न अत्यंत धोकादायक ठरतो. आता तर ती खनिजेसुद्धा संपुष्टात येत आहेत. अगदी पेट्रोलसारखा द्रवपदार्थसुध्दा आता पुरेसा उपलब्ध नाही. यासाठी पेट्रोलला पर्याय शोधण्याचे जागतिक पातळीवर प्रयत्न सुरू आहेत. पर्यायी इंधन ही जगाची गरज होऊ लागली आहे. याचा अर्थ बदलत्या काळात माणसाला जगण्यासाठी पर्यायी मार्गांचाही विचार करावा लागणार आहे. ही जर वस्तुस्थिती असेल तर मग त्याने एकूणच पर्यावरण या व्यापक संकल्पनेचा नीट विचार केला पाहिजे. हवापाण्याबरोबरच या पृथ्वीने आणि निसर्गाने दिलेली सगळ्या प्रकारची देणगी सांभाळून वापरण्याची सवय त्याने केली पाहिजे. आज त्याचीच उणीव असल्यामुळे पर्यावरणाला मोठा धोका उत्पन्न झाला आहे. पर्यावरण हा आता प्रत्येकाच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित असा विषय ठरतो आहे. सकाळी उठल्यापासून ते रात्री झोपेपर्यंत एकूणच मनुष्याच्या आणि समाजाच्या जीवनव्यवहारामध्ये ज्या ज्या गोष्टी सुरू असतात त्याचा आणि पर्यावरणाचा किती पूरक आणि घातक संबंध आहे याचा गंभीरपणे विचार करण्याची वेळ आली आहे. या जाणिवेसाठीच अशा प्रकारच्या जागतिक पर्यावरण दिनाची आवश्यकता आहे.

## चुकीच्या सवयी समस्येला कारण

सध्या तर साध्या साध्या गोष्टींमधून आपण पर्यावरणाला धोका पोहचवत असतो हे कोणाच्याही लक्षात येत नाही. मग तो प्लास्टिक पिशव्या वापरण्याचा प्रकार असो किंवा आजच्या संगणक विभागामध्ये निकामी होणाऱ्या अनेक वस्तूंचा कचरा असो. याची विल्हेवाट कशी लावायची असा गंभीर प्रश्न निर्माण होत आहे. आजच्या माहिती तंत्रज्ञान युगामध्ये संगणकाने क्रांती घडवली.प्रत्येकाला अनेक गोष्टी सहज साध्य झाल्या. परंतु त्यात संगणकातल्या अनेक वस्तू अशा आहेत की त्या जाळूनही किंवा जमिनीत पुरूनही नष्ट होत नाहीत. त्याला अशा या इलेक्ट्रॉनिक कचऱ्याने जगापुढेच प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे. आज मोठ्या प्रमाणावर शहरे वाढत आहेत. परंतु या शहरांमधून अक्षरश: रोज लाखो टन कचरा गोळा होतो. तो कुठे टाकावा. या समस्येने सरकारी संस्थांना ग्रासले आहे. त्यातला एक मार्ग म्हणून कचऱ्यापासून वीजनिर्मिती करण्याचे तंत्र पुढे येत आहे, परंतु त्यालादेखील ज्या वेगाने गती द्यायला हवी ती शासकीय पातळीवरून दिली जात नाही. समाजाच्या सर्वच क्षेत्रामध्ये आज शुद्ध पर्यावरणाची निकड भासत आहे. हवा, पाणी या दोन घटकांबरोबरच समाजातल्या सौजन्यपूर्ण वातावरणाचीही तितकीच गरज आहे. चुकीच्या सवयी आणि अनाठायी सुखाची लालसा, यामुळे पर्यावरणाकडे जाणूनबुजून समाज दुर्लक्ष करत असताना दिसतो. अगदी मुंबई पुण्यासारख्या महानगरातही वाहनांमधून बाहेर पडणारा धूर जीवघेणा ठरत आहे किंवा कोणताही विचार न करता कुठेही थुंकण्याची सवय किंवा नदी नाले, रेल्वे ट्रॅकवर कचरा फेकून देण्याची विचित्र तऱ्हा बघितल्यावर मनुष्य आपल्याच समस्यांसाठी इतका आसुसलेला का आहे असे वाटू लागते. परमेश्वराने दिलेल्या या सुंदर सृष्टीला तितक्याच सौजन्याने आणि संवेदनशीलतेने जपण्याची गरज आहे. तरच पर्यावरण टिकेल आणि मनुष्याचे जीवनमान सुधारेल.